# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि —४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

## महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

### (महाविद्यालयीन विभाग)

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली ४४२६०५(महा.) फोन:०७१३२.२१६५५४,२२३१०४,२१६५९४फॅक्स रू ०७१३२,२२३३२२
**Email : arcollegesectiongug48@gmail.com web:gondwana.digitaluniversity.ac web:gondwanauniversity.org**

(डॉ. एस. एम. रोकडे)
संचालक (प्रभारी)

क्रमांक/महा.वि/गो.वि./6064 /२०१६
दिनांक : 29/ ०३/२०१६

प्रति,

मा. प्राचार्य/अध्यक्ष/सचिव,

सर्व संलग्नित महाविद्यालये

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय:— महाविद्यालयांनी नियमांचे पालन करण्याबाबत

संदर्भ:—१) मा. मंत्री ( उच्च व तंत्रशिक्षण ) यांना दिलेले निवेदन श्री. महेंद्र शिवाजी मिसर, दि. ०४.१.२०१६

२) मा. शिक्षण संचालनालय, पूणे क्र. उशिस/२०१६/नियमावली/मवि—१/३१३९, दि. १०.०३. २०१६

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, संदर्भ क्र. १ नुसार सलंग्नित महाविद्यालयांनी कार्यवाही करून संबंधीत अहवाल विद्यापीठास तात्काळ पाठविण्यात यावा जेणे करून मा. शिक्षण संचालनालय, पुणे यांना कळविणे सोईचे होईल.

संलग्नित:— वरिलप्रमाणे

(डॉ. एस. एम. रोकडे)
संचालक (प्रभारी)
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

1 JAN

महेंद्र शिवाजी मिसर (राज)
शिवाजी नगर नं.२, मनमाड- ४२३ १०४
ता.नांदगांव, जि.नाशिक (महाराष्ट्र)
मो.९८९०४७९८९०
e-mail-rajveer.misar@yahoo.com

प्रति,

मानणीय विनोद तावडे
उच्च व तंत्रशिक्षण मंत्री
महाराष्ट्र शासन

दि. ३१/१२/२०१५

14 JAN 2016

मानणीय महोदय,

महाराष्ट्रातील सर्व अभियांत्रिकी व इतर महाविद्यालयात खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना कोणतीही सवलत दिली जात नाही. SC/ ST प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क माफ केले जाते. त्यांना आरक्षण पण आहे. कमी मार्क असले तरी प्रवेश मिळतो. पण खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना अशी कुठलीच सवलत मिळत नाही.

१) मा. महोदय, खुल्या प्रवर्गातील प्रत्येक विद्यार्थी हा उद्योगपतीचा मुलगा नसतो, हे मागील सरकार प्रमाणे आपलही सरकार विसरल्याचं दिसतय. तर हा विद्यार्थी शेतकरी, हमाली, मजुर, मध्यमवर्गीयांचा पाल्य असू शकतो हे ध्यानात ठेवा. खुल्या प्रवर्गातील एखादा विद्यार्थ्याला अभियांत्रीच्या शिक्षणासाठी ५ ते १० लाख रू. लागतात तेच SC/ ST प्रवर्गातील विद्यार्थ्याला १० ते १५ हजारात अभियांत्रीकीचे शिक्षणाला लागतात. सरकार हा जातीवाद, भेदभाव का करतय.

मा.महोदय, खुल्या प्रवर्गातील विद्यार्थी कर्ज काढून शिक्षण घेत आहेत. कृपया अन्याय करू नका. सर्वांना समान न्याय द्या. त्यांना आरक्षण नको पण इतरांप्रमाणष सोयी सुविधा द्या. इतकीच विनंती.

२) मा.महोदय, महाराष्ट्रातील विविध शाळा तथा महाविद्यालयात ड्रेस कोड लागू करावा व संपूर्ण शरीरभर पोशाख असावा. काही शाळा व महाविद्यालयात मुलींना 'स्कर्ट' किंवा 'झगा' हा ड्रेस कोड आहे. यामुळे मुलींवर अत्याचार वाढत आहे. शाळा महाविद्यालय परिसरातच हे प्रकार होतात हे विशेष.

३) महाविद्यालय, शाळा यांच्याकडून दरवर्षी शैक्षणिक सहली आयोजित केल्या जातात यात मुला-मुलींना वेगवेगळ्या बसेस व राहण्याची वेगवेगळी व्यवस्था करण्यात सक्ती करावी. मागील काही घटनांवरून मुलींची सुरक्षा व काही गैरकृत्यांमुळे या व्यवस्था करणे उचित ठरेल.

४) अभियांत्रिक व वैद्यकीय महाविद्यालयात वार्षिक स्नेह सम्मेलन आयोजित केली जातात. यावर काही नियम कायदे बनविले गेले पाहिजेत. स्नेहसम्मेलनात आक्षेपार्ह पहेरावात नृत्य, फॅशन शो आयोजित केले जातात. हे चुकीचे आहे. कोणतेही महाविद्यालय हे ज्ञानदानासाठी आहे. तेव्हा अशा ठिकाणी अश्लिलता व पेहराव विद्यार्थ्यांना घातक ठरू शकते. महाराष्ट्रातील सर्वच महाविद्यालये ही शिक्षणासाठी असून आज हिच ठिकाणे 'लव्हर्स स्पॉट' बनलेत ही चिंतेची बाब आहे. यात सुधारणा करावी. कृपया सर काहीतरी करा, ही नम्र विनंती.

आपला

M. S. Misar

महेंद्र शिवाजी मिसर (रा

स्वीय सहायक
मंत्री
शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक ...

15/1/16